# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९   वेबसाईट : http://www.mahacet.org   ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.तंशिप्र-१२२४/प्र.क्र.०३/कें.प्र.प्र./सीईटी/२०२४/१८७   दिनांक - २३/०८/२०२४.

## महत्वाची सूचना
## एमबीए लॅटरल एन्ट्री (थेट द्वितीय वर्ष करीता)

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत एमबीए लॅटरल एन्ट्री (थेट द्वितीय वर्ष करीता) या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियकरीता उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज दिनांक २५/०७/२०२४ ते ०७/०८/२०२४ हा कालावधीत भरुन घेण्यात आले होते.

त्याअनुषंगाने अंतरिम गुणवत्ता यादी दिनांक १८/०८/२०२४ रोजी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. सदरील यादीचे अवलोकन केले असता, असे दिसून आले की, ज्या पदवी अभ्यासक्रमांचा निकाल सीजीपीए पध्दतीने घोषित करण्यात आलेला आहे अशा काही उमेदवारांनी चुकीची टक्केवारी नमुद केली आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता आपणांस कळविण्यात येते की, ज्या पदवी अभ्यासक्रमांचा निकाल सीजीपीए पध्दतीने घोषित करण्यात आला आहे अशा सर्व उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेच्या माहिती पुस्तिकामधील नियम ८(३)( c) अन्वये संबंधित सक्षम प्राधिकारी, विद्यापिठ किंवा मंडळाकडून सीजीपीए चे समतुल्य गुणांमध्ये रूपांतर झाल्याचे प्रमाणपत्र अपलोड करण्यात येवून प्रमाणपत्रावरील अचुक टक्के भरण्याकरीता स्वत:च्या लॉगीनमध्ये **दिनांक २४/०८/२०२४ ते २७/०८/२०२४** हा कालावधी देण्यात येत आहे. सीजीपीएचे रुपांतरीत करण्यात आलेले टक्के भरण्याकरीता उमेदवारांच्या लॉगीनमध्ये लिंक (CGPA to Marks Conversion Certificate authorised by concerned competent authority / Board / University) उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

जे उमेदवार दिलेल्या मुदतीमध्ये अचूक टक्के भरणार नाहीत अशा उमेदवारांचे नाव अंतिम गुणवत्ता यादीत समावेश करण्यात येणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**